**बेभान**

तप्त वैराण माळरानाकडे नजर लावून
पिंपळाच्या बुंध्यास टेकून मी शांत उभा
हवेच्या लहरीवर तरंगत आलेला
तो मंद सुवास मला अस्वस्थ करून गेला!
डोळ्यांना जाळणारी ही रखरख खरी की हा सुगंध?
बेचैन उत्सुकतेने मी त्या अज्ञात फुलाचा
मागोवा काढीत वाऱ्याविरूद्ध गेलो
तो वेडावणारा सुखद गंध इतका निकट होता
पण मला त्याचे भान नव्हते
ग्रीष्मात शरदाचे चांदणे शिंपणारे ते प्रीतीपुष्प
माझ्याच हृदयात उमलले होते!

(Translation of a poem by Tagore in his collection “Gitanjali”)